# ‘नियमीत प्रसिध्दी पत्रक’
# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद.

रविवार, दि.२२/११/२०२०
वेळ: १८.४५

## “मोटार वाहन कायदा अंतर्गत २७९ कारवाया- ५६,००० ₹ ‘तडजोड शुल्क प्राप्त.”

उस्मानाबाद जिल्ह्यातील महत्वाच्या रस्त्यांवर दि. २१.११.२०२० रोजी १८ पोलीस ठाणी व उस्मानाबाद शहर वाहतुक शाखा यांनी मोटार वाहन कायदा अंतर्गत २७९ कारवाया करुन ५६,००० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल केले आहे.

## “अवैध मद्य विरोधी कारवाई.”

**पोलीस ठाणे, बेंबळी:** अवैध दारु विक्री होत असलेल्या गोपनीय खबरेवरुन तुळजापूर पो.ठा. च्या पथकाने पो.ठा. हद्दीत दि. २१.११.२०२० रोजी दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापा मारला. पहिल्या घटनेत विकास अशोक डोंगरे, रा. बीजनवाडी, ता. तुळजापूर हा मंगरुळ येथील लबडे पानटपरीच्या पाठीमागे देशी दारुच्या ४७ बाटल्या विनापरवाना बाळगलेला तर दुसऱ्या घटनेत दादाराव लक्ष्मण सापते, रा. कसई, ता. तुळजापूर हा कसई फाटा येथील विराज ढाब्यासमोर विदेशी दारुच्या १६ बाटल्या विनापरवाना बाळगलेला पथकास आढळला.

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:** लक्ष्मण रंबाजी गायकवाड, रा. व्होर्टी, ता. तुळजापूर हा दि. २१.११.२०२० रोजी गावातील आदित्य हॉटेलच्या बाजूस देशी- विदेशी दारुच्या २८ बाटल्या (किं.अं. २,०७४/-रु.) विनापरवाना बाळगला असतांना पो.ठा. नळदुर्ग च्या पथकास आढळला.

**यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद आरोपींविरुध्द संबंधीत पो.ठा. येथे म.दा.का. अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.**

## “अपघात.”

**पोलीस ठाणे, उमरगा:** करबसप्पा ररसिंग मगरे, रा. खजुरी बॉर्डर वस्ती, ता. आळंद, जि. गुलबर्गा हे दि. १९.११.२०२० रोजी १५.०० वा. सु. उमरगा चौरस्ता येथील आळंद रस्त्याच्या कडेला थांबले होते. यावेळी वाहन क्र. एम.एच. १२ वायए ५४४८ च्या चालकाने वाहन निष्काळजीपणे चालवून करबसप्पा मगरे यांना धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले. अपघातानंतर संबंधीत वाहनचालक घटनास्थळावरुन वाहनासह पसार झाला. अशा मजकुराच्या करबसप्पा मगरे यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या लेखी निवेदनावरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३३७, ३३८ आणि मो.वा.का. कलम- १८४, १३४ (अ) (ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, वाशी:** चालक- प्रशांत बळीराम शिनगारे, रा. पारा, ता. वाशी यांनी दि. २१.११.२०२० रोजी १०.३० वा. सु. गावातील पारा चौकात स्विफ्ट डिझायर कार क्र. एम.एच. १२ क्युजी ६२६५ ही निष्काळजीपणे, भरधाव वेगात चालवून चौकात उभे असलेले गावकरी- मच्छिंद्र धर्मा माहोळकर, वय ७०

वर्षे यांना समोरुन धडक दिली. या अपघातात मच्छिंद्र माहोळकर हे गंभीर जखमी होउन मयत झाले. अपघातानंतर नमूद वाहन चालक घटनास्थळावरुन वाहनासह पसार झाला. अशा मजकुराच्या जालिंदर मच्छिंद्र मोहोळकर यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३०४ (अ) आणि मो.वा.का. कलम- १८४, १३४ (अ) (ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, उमरगा:** शिवाबाई काशीनाथ गायकवाड, वय ६० वर्षे, रा. जवळगा बेट, ता. उमरगा या दि. २०.११.२०२० रोजी २२.३० वा. सु. लक्ष्मी पाटी जवळील रस्त्याने पायी चालत जात होत्या. यावेळी अज्ञात वाहनाने शिवाबाई गायकवाड यांना धडक दिल्याने शिवाबाई या गंभीर जखमी होउन मयत झाल्या. अपघातानंतर संबंधत वाहन चालक घटनास्थळावरुन वाहनासह पसार झाला. अशा मजकुराच्या राजेंद्र काशीनाथ गायकवाड (मयताचा मुलगा) यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) आणि मो.वा.का. कलम- १८४, १३४ (अ) (ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद (ग्रा.):** शुभम शिवाजी अंकुशराव व सागर सुनिल सोनवणे, दोघे रा. कौडगाव (खा.), ता. उस्मानाबाद हे दोघे दि. १८.११.२०२० रोजी १४.३० वा. सु. भडाचीवाडी शिवारातील शुभम मंगल कार्यालयासमोरील रस्त्याने ॲक्टीव्हा स्कुटर क्र. एम.एच. २५ एई ९१०५ ने प्रवास करत होते. यावेळी मारुती सुझूकी कारक्र. एम.एच. ४४ जी ३९१९ च्या अज्ञात चालकाने कार निष्काळजीपणे चालवून शुभम अंकुशराव चालवत असलेल्या नमूद स्कुटरला धडक दिली. या अपघतात शुभम व सागर हे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर नमूद कारचा अज्ञात चालक घटनास्थळावरुन कारसह पसार झाला. अशा मजकुराच्या शुभम अंकुशराव यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या लेखी निवेदनावरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३३७, ३३८ आणि मो.वा.का. कलम- १८४, १३४ (अ) (ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## "मारहाण."

**पोलीस ठाणे, लोहारा:** सुजाता बालाजी साळुंके, रा. धानुरी, ता. लोहारा यांच्या शेताच्या सामाईक बांधावरील झाडे भाऊबंद- भरत तुकाराम साळुंके, विशाल साळुंके, तुकाराम साळुंके हे दि. २१.११.२०२० रोजी १२.०० वा. सु. तोडत होते. यावर सुजाता यांनी त्यांना विरोध केला असता त्या तीघांनी सुजाता साळुंके यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन सुजाता यांच्या हातावर कुऱ्हाडीने वार करुन जखमी केले व ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या सुजाता साळुंके यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, परंडा:** विजय बळीराम हजारे कौंडगाव, ता. परंडा यांच्या शेतातील पाणी शेजारच्या- गोफणे यांच्या शेतात गेले होते. याचा राग मनात धरुन दि. २१.११.२०२० रोजी १७.३० वा. सु. गोफणे कुटूंबातील विकास, जयदेव, धैर्यशील, विशाल, बाजीराव, बाआ, किसन, औदुंबर, कुलदीप यांनी बळीराम व विजय हजारे या पिता- पुत्रांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी, काठीने मारहाण करुन जखमी केले. अशा मजकुराच्या विजय हजारे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुने भा.दं.सं. कलम- ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४८, १४९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**जनसंपर्क विभाग, उस्मानाबाद पोलीस.**